०१. झूठी मिट्टी

०२. मर्ज़ को ढूँढ़नेवाले

०३. घेरा रचकों की नादानी/मूर्खता

०४. विलोपन के खेल

०५. युद्ध आरंभाचे

# पूर्वज

१८ अंश, ३५ मिनिटे आणि २० सेकंद – उत्तर ; ७४ अंश, ३२ मिनिटे आणि २० सेकंद – पूर्व.

भीमा नदीची प्रमुख उपनदी असलेल्या घोड नदीच्या काठी इनामगाव वसले आहे. हडप्पा युगाच्या उत्तरार्धात आद्य ऐतिहासिक व्यापारी केंद्र म्हणून भरभराटीस आलेले हे गाव, आज फक्त एक उत्खनन स्थळ म्हणून उरले आहे. या स्थळाचा शोध, १९६३ साली डॉ. म.के.ढवळीकर यांच्या नेतृत्वाखाली काम करणाऱ्या पुरातत्वशास्त्रज्ञांच्या चमूने लावला. तेव्हा त्यांना इनामगावातील स्थानिक रहिवाशांची मृतांना हाताळण्याची आश्चर्यकारक पद्धत आढळली.

एकूण २४३ थडग्यांच्या दफनभूमीवर पुरातत्वशास्त्रज्ञानी शोध लावला. मोकळ्या जागी दफन केलेल्या मृतदेहाच्या दोन्ही बाजूला सुर्यकांत मण्यांनी अलंकृत केलेली तांब्याची अवजारे, अलंकार, शस्त्रास्त्रे आहेत. प्रत्येक मृतदेह अगदी अचूकपणे होकायंत्राच्या सुईसारखे डोके उत्तरेकडे ठेवले आहे. त्यांची पावले घोट्यापासून तोडली गेलेली आहेत. पुरातत्वशास्त्रज्ञाच्या मते आत्म्याला पृथ्वीवरून निघून जाता यावे म्हणून ही प्रथा पडली असावी.

इतकच नाही तर या दफनभूमीमध्ये अजून एक प्रकार असा आढळला जो अधिकच आश्चर्यकारक होता. दफनभूमीच्या मध्यभागी सापडलेल्या एका मोठ्या इमारतीच्या अवशेषांखाली मृतदेह पुरलेला आढळला. ही इमारत कदाचित् एखादे मंदिर किंवा किंल्ला. हा देह ३५ वर्षांच्या पुरुषाचा असून तो पायावर पाय टाकून बसलेल्या अवस्थेत आहे आणि त्याचा तो एका चार पाय असणाऱ्या महाकाय पशूच्या आकाराच्या भल्यामोठ्या टेराकोटाच्या घडयात पुरलेला आढळला. त्याच्या त्या दफन घड्याभोवताली अनेक विचित्र वस्तू मिळाल्या. मोठे धार्मिक मुखवटे, धार्मिक विधीसाठी वापरली जाणारे खंजीर, शिंगाचे पाते, शेतीची अवजारे, शास्त्रीय उपकरणे, आणि त्या प्राचीन भांड्याच्या आत नवसासाठीच्या मूर्ती आढळल्या.

हे जेव्हा उघडकीस आले तेव्हा भारतीय पुरातत्वशास्त्रज्ञांची झोपच उडाली. या बसलेल्या माणसाची ओळख काय असावी याविषयी विविध मते मांडण्यात आली. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाच्या काही सभासदांच्या मते घराच्या आत असणारा हा एकमेव दफन केलेला मृतदेह आणि त्याच्या भोवताली सापडलेली अवजारे आणि मण्यांचे लहान दागिने बघता हा पुरुष इनामगावचा प्रमुख असावा.

तर इतरांच्या मते हा माणूस इनामगावातलाच नसावा. कोणी तरी परका वा भटक्या जमातीचा असावा. त्याच्या जमातीचे लोक बहुदा भीमा खोऱ्यातील प्राचीन पुरात बळी गेल्याने फार आधीच नहेसे झाले असावेत. म्हणून त्याला त्याच्या जमातीच्या परंपरेनुसार या अशा वैशिष्ट्यपूर्ण थडग्यात पुरले असावे.

चार पायांच्या थडग्याच्या आतल्या बाजूला होडीच्या आकारसारखे चिन्ह सापडल्याने हे मत ग्राह्य धरले जाऊ शकते. ढवळीकरांच्या उत्खनन चमूतील ज्या सभासदाने हे थडगे शोधून काढले तो ‘मूक शोधक या टोपणनावाने ओळखला जातो. या मूक शोधकाने गुप्त कागदपत्रांची मालिका प्रकाशित केली, त्या आधारे त्याने केलेल्या युक्तीवादानुसार, होडीचे चिन्ह हे आंतरआयामी प्रवासाची शक्यता लक्षात घेतल्यास संपूर्ण संस्कृतीच्या एकमेकावर असणाऱ्या विश्वासाचे प्रतिनिधित्व करणारे असू शकते. या विधानाला सुरवातीला स्थापत्यशास्त्रज्ञांकडून आश्चर्य वाटावे इतका पाठींबा मिळला असला तरी, १९७५ सालच्या राष्ट्रीय आणीबाणीच्या काळात भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाने या मूक शोधकाचा यांचा युक्तिवाद अधिकृतरीत्या रद्द केला.

तो परका असण्याची जी संभावना व्यक्त केली गेली आहे त्याचे वर्णन भारतीय पुरातत्व सर्वेक्षणच्या प्रस्थापीत पद्धतीशी विसंगत असलेले विचलन जमावाच्या भावना भडकविण्याच्या दुर्भावनेने केलेले आहे. ”या वस्तुंचे विचित्र स्वरूप पाहता, या वस्तुंच्या उत्पत्ती विषयी कोणतीही खात्री देता येऊ शकत नाही. इनामगाव संस्कृतीच्या आधी लयाला गेलेल्या संस्कृतीतील या वस्तू आहेत का? की ते खरेच पाठीवर अनेक युगांच्या इतिहासाचे गाठोडे टाकून काळ आणि अवकाश ओलांडून या टोकापासून त्या टोकापर्यंत फिरत रहाणारे मूक शोधकाचे जहाज आहे?

जरी आता या प्रश्नांची उत्तरे मिळणे शक्य नसले तरी एक गोष्ट नक्की : ते आता इथे आहेत.

# ०१. पडलेली माती

हद हद करते सब गए और बेहद गए न कोए

अनहद के मैदान में रहा कबीरा सोय

अथक प्रयत्नांनातर पुरातत्वशास्त्रज्ञांना जाणीव झाली की भूविज्ञान मानवी भावभावनांशी खेळू शकते.

या विचित्र घटनेचे वर्णन ‘अतिशय पुरातन’ असे करता येईल. मातीच्या थराखाली सापडलेल्या ऐतहासिक कालखंडाशी विसंगत असणाऱ्या वस्तुंचे असे वर्णन केले जाते. खरं तर मातीखाली पुरल्या गेलेल्या कितीतरी आधीच्या काळातील त्या असू शकतात.

पृथ्वी आणि तिच्या पोटात दडलेले असे बरेच काही आहे जे गुंतागुंतीचे असू शकते याचा विचार  ऐतिहासिक कालक्रमानुसार त्याचे वर्गीकरण करण्याआधी केला गेला पाहिजे.

इनामगाव येथील मातीच्या पोटात दडलेले हे काही वेगळे नाही. मित्रा यातील काहीही आपल्या मूळ ठिकाणाहून आलेले नाही.

# ०२. आजाराबाबतची जिज्ञासा

रोगाची अनाकलनीय सुरुवात हा खूपच वादाचा आणि चर्चेचा विषय होता. दुःखाचे कारण आणि त्याची सुरवात असणाऱ्या या परस्परपुरक संकल्पनांनी असंतुष्ट स्वार्थसाधू लोकांचा गट आणि धर्म बदलणाऱ्याच्या  पंथाना जन्म दिला. प्रत्येकाची आपापली रहस्यमय औषधोपचार आणि इलाज पद्धती आहे.

१ चांदी भक्षक ही चंद्राची उपासना करणारी भटकी जमात होती, म्हणूनच त्यांचा असा समज होता की रात्रीच्या फसव्या अंधारात ते प्लेगला चकवू शकतात. सकाळ होताच ते फिरस्त्या बाजारपेठा उभारत जिथे ते भूतकाळाच्या सावलीतून बाहेर पडण्यासाठी, चांदीच्या पात्रातून कोरून काढलेल्या गोळ्या विकत.

२ दफन विधी करणाऱ्यांचा असा ठाम विश्वास होता की, गुरांच्या चिकट चरबीने आंघोळ केल्याने ते स्वतःला विषाणूंपासून दूर ठेऊ शकतात. रात्रीच्या अंधारात शेतांवर धाड घालणारी ही देखील निशाचर जमात होती, ज्यांची चरबीने माखलेली शरीरे रात्रीच्या अंधारात चमकत असत.

३ चिन्हांकित व्यक्ती म्हणून ओळखल्या जाणाऱ्यांनी एक वैष्ट्यपूर्ण लसीकरण तंत्र विकसित केले होते. त्यांच्या मते विषाणू विरोधी बहिर्द्रव्य असणाऱ्या माकूलच्या शाईने स्वतःला गोंदवून घेत खऱ्या आणि काल्पनिक जनावरांच्या अभौमितिक आकृत्या आपल्या समूहातील लोकांच्या हातापायांवर चितारीत असत.

४ निशाचरी जमतीच्या समजुतीप्रमाणे रोगजंतू हे आपली अनाकलनीय लहर आणि इच्छा पूर्ण करण्यासाठी उघड्या डोळ्यांच्या वाटे आत प्रवेश करून शरीरीचा ताबा घेत पीडितांच्या मनावर आक्रमण करतात. यापासून संरक्षण मिळावे म्हणून त्यांनी स्वतःला अच्छादून घेत दिवसाच्या प्रकाशाला स्पर्श करणाऱ्या सर्व गोष्टींपासून दूर ठेवले. आज विस्मृतीत गेलेल्या भाषेत कुजबुजत्या स्वरातील स्तोत्रांच्या भाषेत हे अंध द्रष्टे एकमेकांशी संवाद साधत.

# ०३. कुंपण बनविण्याऱ्याचा मूर्खपणा

२०वे शतक उजाडतानाच, आधुनिक प्रतिमांचे पितामह पॉल सेझाँ यांनी घोषित केले की, दृश्यमान असणाऱ्या या विश्वाची विशालता छोट्या छोट्या चौकटीमध्ये नीट बसवून जर दाखवली तर ती चित्रांच्या चौकटीच्या मर्यादेत प्रस्तुत करता येऊ शकते. त्यांनी म्हंटले, “आपण वास्तवावरच समाधानी न राहता वास्तवाला आकार दिला पाहिजे आणि पुनर्रचनेद्वारे त्याची पुन्हा मांडणी केली पाहिजे. आपल्या रचनांच्या नियमानुसार त्यांचे पुनःसमायोजन केले पाहिजे. ”

वर्गीकरणाद्वारे वास्तव समजून घेण्याच्या या अतिरेकाने आधुनिकतेस अनुकूल असणाऱ्या मनांना त्रास दिला आहे. हा मानसिक क्लेश झाला असूनही, प्रतिबंधीत घन मानवतेच्या संस्कृतीचे दीर्घकालीन प्रतिक ठरले आहे. घनाने मानवाचा सागरापासून ताऱ्यांपर्यंत माग घेतला आहे. कारण,  जिथे जिथे माणूस पोहोचला तिथे तिथे त्याने घन ठेवले.

दगडी भिंतीपासून विटांपर्यंत, लोखंडी पिंजरे, कॉंक्रीट ब्लॉक्स, पुठ्ठयाची खोकी, कुंपण आणि  विलगीकरण विभाग, अशी मानवकडे स्वतःला चौकटीत ठेवण्याची असाधारण क्षमता आहे. उदाहरणार्थ वर्गीकरण करणे, वेगळे करणे, वगळणे आणि बहिष्कृत करणे. जे बंदिस्त होण्यास नकार देते ते सगळे प्रवादांच्या क्षेत्रात हद्दपार केले जाते.

अफवा पसरू लागल्या आहेत हे आपल्याला माहीत आहे. तेव्हा मित्रा घाबरू नको.

# ०४. लुप्त होणारे खेळ

इनामगावाच्या अस्ताविषयी असणाऱ्या अनेक धारणापैकी, एकीचा प्रामुख्याने उल्लेख केला जातो. संपूर्ण उपखंडातील पुरातत्वशास्त्रज्ञ एकमताने मान्य करतात की या संस्कृतीचा विनाश भीमा खोऱ्यात आलेल्या पुरामुळे झाला.

भूगर्भशास्त्रीय पुराव्यानुसार असणाऱ्या पाण्यामुळे भीमा नदीला पूर येण्याच्या विधानाला जरी पुष्टी मिळत असली तरी  इनामगावात सापडलेले मृतदेह काही वेगळच सांगतात. कारण या मृतदेहावर  बुडाल्याने किंवा पाण्यामुळे मृत्यू आल्याच्या काहीच खुणा दिसत नाहीत. नदीला अनेकदा पूर आला  असेल आणि तो ओसरलाही असेल, शस्त्र, भांडी, खेळणी आणि मण्यांच्या अलंकारांसारख्या उत्खननाच्या ठिकाणी सापडलेल्या वस्तू जशाच्या तशा आहेत. त्यावरून हे विधान खोडून काढण्यास अधिक पुष्टी मिळते.

अर्थातच नदीच्या प्रवाहाबरोबर काही गोष्टी नक्कीच वाहून गेल्या असाव्यात, जसे इनामगावातील मागे उरलेल्या अवशेषात घड्याळे, दिनदर्शिका, कालदर्शी (chronoscopes), सौर्य घड्याळे (sundial) याचा काहीच मागमूसही नव्हता. हे सगळे त्याआधीच्या आणि त्या नंतरच्या लोकसंस्कृतीत अस्तित्वात होते. या प्रवाहात जणू काळच हरवून गेला होता.

वेळ सांगणाऱ्या या सगळ्याच यंत्राच्या अनुपस्थितीमुळे, इनामगावच्या रहिवाशांना वेळ कशी समजत असेल याचा काहीच अंदाज बांधता येत नाही. त्यांच्यासाठी वेळ ही समजण्याची किंवा मोजण्याची वस्तू नव्हती, तर तो एक प्रवाह होता जो पार करायचा होता. आणि वेळ घालविण्यासाठी त्यांच्याकडे खूप खेळ होते.

व्यक्तिमत्वास आकार देण्यासाठी आणि चरित्र विकासासाठी ते खेळत असणारे खेळ, स्पर्धा, संधीचे खेळ ज्यामुळे जगाचे लक्ष वेधणारी अनेक आश्चर्ये त्यांनी दिली. नकलांचे खेळ, ज्यामध्ये त्यांनी संबंध आणि पुनरावृत्ती या दोन्ही गोष्टीना आमंत्रित केले. आणि  शेवटचा खेळ  चक्रीवादळ  आधुनिक विचारानुसार ज्याला तर्कशुद्धता समजले जाते असा दूरच्या सीमेवर खेळला जाणारा खेळ.  दीर्घकाळ चिखलात अडकलेले ते आज आपल्या समोर आले आहेत, इनामगावातील पूर्वजांना अशा कोणत्याच सीमांची कल्पना नव्हती आणि त्यांनी स्वेच्छेने स्वतःला मातीत समर्पित केले.

# ०५. युद्ध आरंभाचे

मृतास दफन करणे हा फक्त एका प्रकियेचा भाग आहे. अशा एका रस्त्यावर टाकलेलं पाऊल ज्यामुळे इहलोक आणि परलोक यांच्यातील अंतर स्पष्ट होते.

या रस्त्यावरून चालताना मानवाने, प्रकटन केले, साम्राज्ये वसविली, बंडखोरी केली, तंत्रज्ञान विकसित केले, चोरी केली, रंगभूमीवर आविष्कार सादर केले, राजकीय मोहिमा काढल्या, व्याधी सोसल्या, रोगप्रतिबंधक लसीकरण केले, सिद्धांतरोपण केले, विश्वास प्रणाली आणि पाखंडी मते व्यक्त केले आहे. जेव्हा या सगळ्या वैविध्यपूर्ण पद्धती एकत्र केल्या जातात, तेव्हा मानवी संस्कृतीचे महत्व स्पष्ट होते. या संस्कृतीच्या महत्वाचे मूळ परस्परविरोधी काल्पनिक मतांच्या दुहेरी विचारात आहे. पहिले श्रेय रुसोंला दिले पाहिजे, ज्याने मानवाच्या उत्पत्तीची कल्पना, कृपेपासून अवकृपेपर्यंत अशी केली आहे.

आपली सुरवात समान हेतूने एकत्रित आलेल्या माणसांच्या छोट्या गटांपासून झाली असावी. मानवी उत्तप्त्तीच्या सुरवातीला आपण दहा ते बारा लोकांच्या छोट्या समुहापेक्षा जास्त भरभराट केली नाही.

मात्र जटील मानवी संस्कृतीच्या आगमनाने, तसेच पंथ, रचना, राज्य आणि समाज यामध्ये होत गेलेल्या त्याच्या विस्तारामुळे आपला स्वतःशीच असणारा संपर्क तुटला, नोकरशाहीच्या पडलेल्या दंडुक्यामुळे आपल्यातला बंधुभाव नष्ट झाला.

दुसऱ्या कल्पनेचे श्रेय थॉमस हॉब्जच्या 'लेव्हीयेथन'ला जाते. ज्यानुसार मानवजात ही जन्मतः रानटी म्हणून अभिप्रेत आहे.

यानुसार, मानव हा नेहमीच स्वकेंद्री राहिला आहे. कायमच संचिताचा विचार करणारा. आपण नेहमीच भटके, पाशवी, अविचारी आणि क्रूर सरंजामी प्राणी आहोत जे सतत स्वतःवर युद्ध लादत असतात.

आत्तापर्यंत या दुर्दम्य अवस्थेतेचे जे काही निर्मूलन झाले आहे ते फक्त रुसोच्या मिथिकांचे आरोप असणाऱ्या सभ्यतेच्या प्राणालीच्या स्थापनेमुळेच शक्य झाले आहे. मानवी सभ्यतेसाठी, आपल्यातल्याच पशुप्रवृत्तीला बाहेर हाकलण्यासाठी धक्का देणे इतकेच गरजेचे आहे.

आपल्यातल्याच या परस्परविरोधी उत्पत्तीच्या कचाट्यातल्या संघर्षात सापडले असतानाच, काळाइतक्याच प्राचीन असणाऱ्या, ज्ञानशास्त्रीय गोंधळात सापडतो.

या आपल्या उत्पत्तीवरच हक्क सांगणाऱ्या दोन्ही बाबी म्हणजे, अविचल भूतकाळावर स्वतःला लादणाऱ्या केवळ विकृत कल्पना आहेत. मातीची भांडी, वाडगे, पाती, दळणाचे जाते, मृतांची स्मारके आणि अशी काळाच्या उदराआडून मिळालेली प्रत्येक गोष्ट ही त्या प्राचीन युद्धात सामील झालेल्या आढळतात.

परंतु या काळाच्या व्युहातल्या रिकाम्या जागांमधून, मानववंशशास्त्रज्ञ, मार्गारेट मीड यांनी हाडांच्या आकारातील तिसरा दावेदार शोधून काढला. ते म्हणजे मांडीचे हाड – नितंब आणि गुडघ्याला जोडणारे, मानवी शरीरातील सगळ्यात लांब हाड, जे १५,००० वर्षांपूर्वी मोडलेले होते.

अश्मयुगात जर हे हाड मोडले तर कोणत्याही आधुनिक औषधांचा वापर न करता, बरे होण्यास सहा आठवड्यांचा कालावधी लागे. या काळात धोक्यापासून पळता येणार नाही, पिणे किंवा अन्न शोधणे शक्य नाही. या अवस्थेत जखमी होणे म्हणजे तुमच्या सावजाच्या भक्ष्यस्थानी पडणे. तरीही हे जे विशीष्ट हाड मोडले होते ते जुळून आले.

हे हाड याचीच साक्ष देतो की हा पडलेला कोणाला तरी मिळाला ज्यांनी त्याची जखम बांधली, त्यावर मलमपट्टी केली, सुरक्षित स्थळी हलवलं आणि ते बरे होईपर्यंत त्यांची काळजी घेतली. आपल्या संस्कृतीची मूळे ही धक्का देण्यामध्ये किंवा पडण्यामध्ये नाहीत तर पुन्हा उठण्याच्या क्षमतेमध्ये आहेत याचीच हे प्राचीन हाड स्मरण करून देते.